बौद्धिक सम्पदा भारत

भौगोलिक उपदर्शन रजिस्ट्री
Geographical Indications Registry

INTELLECTUAL PROPERTY INDIA

# भौगोलिक चिन्हांकन नोंदणीकृत फलोत्पादन पिकाकरिता *"अधिकृत वापर करता"* म्हणून नोंदणी चे महत्व.


**गोविंद हांडे**
तांत्रिक सल्लागार , निर्यात
महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ
कृषी आयुक्तालय पुणे-9423575956


"**भौगोलिक चिन्हांकन ही एक प्रकारची मानांकन नोंद आहे, जी भौगोलिक क्षेत्राशी निगडीत आहे. नैसर्गिकरित्या व मानवी प्रयत्नातून उत्पादित होणाऱ्या कृषी मालाची ओळख, त्याद्वारे त्याची खास गुणवत्तेतील सातत्य व त्यांच्यामधील विशेष गुणधर्माचे जतन करण्यासाठी हे चिन्हांकन उपयुक्त आहे तसेच भौगोलिक चिन्हांकन प्राप्त फलोत्पादन पिकाकरिता ब्रँडिंगद्वारे विक्री व निर्यातीकरिता अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करणे अत्यंत आवश्यक आहे.**"

सन 1995 मध्ये कृषी या विषयाचा प्रथमच जागतिक व्यापार करारामध्ये समावेश करण्यात आला .सदर तरतुदीमुळे शेतमालासाठी जागतिक बाजारपेठ खुली झाली **".जागतिक व्यापार संघटने "**मार्फत जागतिक व्यापार कराराअंतर्गत विविध करार करण्यात आले त्यातील एक महत्त्वाचा करार म्हणजे **"व्यापार संबंधित बौद्धिक मालमत्ता अधिकार "** हा होय .हा करार उत्पादनाचे पेटंट डिझाईन आणि त्याची **भौगोलिक चिन्हांकन** व ट्रेडमार्क नोंदणी करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

या करारानुसार भौगोलिक क्षेत्राशी निगडित उत्पादित मालास संरक्षण देण्यासाठी भारतीय संसदेकडून दिनांक 30 डिसेंबर 1991 रोजी **"भौगोलिक प्रदर्शन नोंदणी व संरक्षण अधिनियम 1999 "** पारित करण्यात आला .सदर कायद्याअंतर्गत

**"बौद्धिक संपदा हक्क"** म्हणून कृषीमाला करिता भौगोलिक चिन्हांकन नोंदणी करण्याचे काम केंद्र शासनाच्या जिऑग्राफिकल इंडिकेशन नोंदणी कार्यालय चेन्नई मार्फत केले जाते. सदर कायद्याअंतर्गत उत्पादनाची नोंदणी करण्याकरता एकूण चौतीस प्रकारची वर्गवारी तयार करण्यात आले आहे. त्यामध्ये कृषी व फलोत्पादन पिकांचा समावेश करण्यात करण्यात आला आहे. जागतिक बाजारपेठांमध्ये भौगोलिक चिन्हांकन मानांकित प्रॉडक्टच्या निर्यातीस विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

भौगोलिक चिन्हांकन एक प्रकारचे मानांकन नोंद आहे जी भौगोलिक क्षेत्राशी निगडित आहे . नैसर्गिकरित्या व मानवी प्रयत्नातून उत्पादित होणाऱ्या कृषी मालाची ओळख त्याद्वारे त्याची खास गुणवत्ता, गुणवत्तेतील सातत्य व त्यांच्यामार्फत विशेष गुणधर्माचे जतन करण्यासाठी व त्याची विक्री करण्या साठी हे चिन्हांकन उपयुक्त आहे भौगोलिक मानांकन हा सामुदायिक हक्क आहे. जेव्हा एखादा शेतकरी समूह एखाद्या पिकाचे लागवड करतो किंवा एखादा पदार्थ बनवतो तेव्हा त्याला तेथील भौगोलिक परिस्थिती नुसार काही गुणधर्म वैशिष्ट्ये मिळालेली असतात. त्यामुळे त्या पिकांची किंवा उत्पादनाची विशेष गुणवत्ता निर्माण होते .तेथील हवामान ,माती आणि पाणी याचा त्या उत्पादनावर परिणाम झालेला असतो त्यामुळे या उत्पादनाला एक वैशिष्ट्य प्राप्त झालेले असते. या वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनाची बौद्धिक संपत्ती म्हणून भौगोलिक प्रदर्शन नोंदणी व संरक्षण अधिनियम 1999 या कायद्याखाली नोंदणी करून त्याला संरक्षण देणे हा भौगोलिक चिन्हांकन नोंदणीचा मुख्य हेतू आहे

**भौगोलिक चिन्हांकन नोंदणीचे फायदे**

- भौगोलिक क्षेत्राशी निगडित आलास कायदेशीर संरक्षण प्राप्त होते
- भौगोलिक चिन्हांकन कायद्याखाली नोंदणी केल्याने हीच राणी त्याबाबत अनधिकृत वापर केल्यास त्याला त्यापासून रोखता येते
- भौगोलिक चिन्हांकन मालास निर्यातीसाठी अधिक संधी उपलब्ध होतात अशा नोंदणी करत कृषी मालास राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर ब्रँड होण्यास मदत होते.

- व्यापारी चिन्हाला बाजारपेठेत जे महत्व असते तेच महत्त्व कृषिमालाच्या भौगोलिक चिन्हांकन आस असते त्यामुळे असे नोंदणी केलेल्या उत्पादनाच्या उत्पादकाला जास्तीचे आर्थिक उत्पन्न मिळून त्याच्या उन्नतीस हातभार लागतो.

**भौगोलिक चिन्हांकन नोंदणीसाठी अर्ज कोण करू शकतो**

कोणताही नोंदणीकृत व्यक्ती समूह किंवा उत्पादन उत्पादक संघटना जी त्या उत्पादनाच्या काशी संबंधित असेल फक्त तेच ह्याची नामांकन नोंदणीसाठी अर्ज करू शकतात. संबंधित कार्यक्षेत्रात उत्पादित होणाऱ्या सर्व कृषी मालासाठी ह्याचा फायदा घेता येतो कारण सदरची बौद्धिक संपदा ही सामूहिक हक्काची असते याची वैयक्तिक स्वरूपात नोंदणी करता येत नाही अर्जदार संस्था कोणीही असली तरी त्या पिकाच्या भौगोलिक क्षेत्रांमधील इतर शेतकऱ्यांना सुद्धा या नोंदणीचा अधिकृत वापर करता म्हणून फायदा घेता येतो.

सदरची नोंदणी हे दहा वर्षाकरिता केली जाते ,दर दहा वर्षांनी पुढील कालावधीकरिता नूतनीकरण करणे आवश्यक असते. फक्त नोंदणी करून उपयोग होणार नाही तर नोंदणीनंतर संबंधित मालाच्या गुणवत्तेमध्ये सातत्य राखणे, बिगर सभासद शेतकऱ्यांना सुद्धा याचा लाभ देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. या मालाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये गुणवत्तापूर्ण ब्रँड म्हणून विकसित करणे हे महत्त्वाचे काम यापुढे सर्व अर्जदार संस्थाने करावयाचे आहे.

महाराष्ट्र राज्य हे फलोत्पादन मध्ये अग्रेसर असून राज्यातील विविध भागांमध्ये उत्कृष्ट दर्जाची फळे व भाजीपाला यांचे उत्पादन घेतले जाते. विविध फळे व भाजीपाला यांची ओळख त्याच्या भागातील वैशिष्ट्यपूर्ण बाबी करिता प्रसिद्ध आहे. वरील वस्तुस्थितीचा विचार करून सदर पिकाच्या गुणवत्तेस हमीभाव मिळविण्याच्या दृष्टिकोनातून भौगोलिक चिन्हांकन नोंदणीस विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

राज्यातील एकूण 20 वैविध्यपूर्ण फळे व भाजीपाला पिकाकरिता भौगोलिक चिन्हांकन नोंदणी कार्यालय चेन्नई मार्फत भौगोलिक चिन्हांकन दर्जा प्राप्त झाला आहे . त्याची नावे खालील प्रमाणे आहेत.

**1.महाबळेश्वरची स्ट्रॉबेरी 2. नाशिकची द्राक्ष 3.नागपुरची संत्री 4.लासलगाव चा कांदा 5.जळगावचे भरीत वांगी 6.सासवडचे अंजीर 7.सोलापूर डाळिंब 8.सांगलीचा बेदाना 9.जालन्याची मोसंबी 10.बीडचे सिताफळ 11.वेंगुर्ल्याचा काजू 12. घोलवड चे चिकू 13.जळगावची केळी 14.मराठवाडा केशर आंबा 15.कोकणचा हापूस आंबा 16.सांगलीची हळद 17.सातार्‍याचा वाघ्या घेवडा 18.रत्नागिरी व सिंधुदुर्ग ची कोकम 19.भिवापूर ची मिरची 20.वायगाव ची हळद**

महाराष्ट्रातील ज्या विविध फळे व भाजीपाला उत्पादनांना भौगोलिक मानांकन मिळाले आहे त्यांच्यासाठी जागतिक बाजारपेठेत विशेष संधी निर्माण झाली आहे .त्याचा एक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्वतंत्र ब्रँड तयार करण्याची संधी निर्माण झाली आहे . त्यामुळे भौगोलिक मानांकणांचा फायदा घेऊन आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपल्या उत्पादनांना अधिकाधिक मूल्य प्राप्त करून घेण्यासाठी भौगोलिक चिन्हांकन प्राप्त कार्यक्षेत्रातील संबंधित पिकाच्या उत्पादक शेतकर्‍यांनी अधिकृत वापर वापर करता म्हणून नोंदणी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**भौगोलिक चिन्हांकित उत्पादनासाठी अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करण्याची कार्यपद्धती**

भौगोलिक चिन्हांकन नोंदणी कार्यालयामार्फत ज्या पिकांना भौगोलिक चिन्हकणाचा दर्जा प्राप्त झाला आहे त्या पिकाच्या भौगोलिक क्षेत्रातील संबंधित पिकाच्या उत्पादन करणार्‍या शेतकर्‍यांना अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करता येते.

**अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करण्याकरता कोण कोणत्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते.**

- भौगोलिक चिन्हांकित पिकाकरिता अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करण्याकरिता GI- 3A मध्ये अर्ज करणे आवश्यक.

- अर्जासोबत सातबारा ची स्वय साक्षांकित प्रत तसेच सदर पिकाची ट्रॅसिअबिलिटी नेट अंतर्गत नोंदणी केली असल्यास नोंदणी ची प्रत
- भौगोलिक चिन्हांकन नोंदणीकृत कार्यक्षेत्रातील पिकाचे उत्पादक असल्याचे व त्या दर्जाचे उत्पादन करण्या नसल्याबाबतचे शेतकऱ्याचे हमीपत्र
- त्या संस्थेच्या नावाने ज्या पिकाकरिता भौगोलिक चिन्हांकन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे त्या संस्थेचे संबंधित शेतकऱ्यांच्या नावाने अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करण्याकरिता शिफारस पत्र
- अधिकृत वापर करता नोंदणी करण्यासाठी निर्धारित केलेली फी डीडी किंवा चेक द्वारे रजिस्टर जिओग्राफिक एल इंडिकेशन चेन्नई यांच्या नावे भरणे आवश्यक.

**अधिकृत वापर करता नोंदणी करण्याकरिता अर्जात भरावयाचा तपशील**

- ज्या शेतकऱ्यांच्या नावाने अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करावयाची आहे त्या शेतकऱ्याचे पूर्ण नाव
- अर्ज कर्त्या शेतकर्याचे पूर्ण पत्ता
- ज्या पिकाकरिता अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करावयाची आहे त्या पिकाचे भौगोलिक मानांकन प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक
- अर्ज कर्त्याचा ई-मेल
- अर्ज कर्त्याचा फोन नंबर किंवा मोबाईल नंबर

**अर्जात द्यावयाचे डिक्लेरेशन**

- भौगोलिक चिन्हांकन नोंदणीकृत संस्थेचे नाव व मानपत्र क्रमांक तसेच सदर पिकाचे उत्पादन व गुणवत्तेबाबत हमी
- सदर अर्जासोबत दिलेली माहिती एक खरी असल्याबाबतचे आम्ही
- माझ्या चुकीच्या माहितीमुळे माझा अर्ज रद्द झाला किंवा मला मिळालेल्या अधिकृत वापर करता प्रमाणपत्र चुकीच्या माहिती बाबत रद्द झाल्यास माझी काही तक्रार राहणार नाही

- दिनांक ,ठिकाण ,अर्ज कर्त्याची स्वाक्षरी ,इत्यादी तपशील अधिकृत वापर करतात नोंदणी करण्याकरिता विहित केलेल्या अर्जामध्ये संबंधित शेतकऱ्यांनी माहिती देणे आवश्यक आहे.

**अधिकृत वापर करता नोंदणी करण्याकरिता अर्ज पाठविण्यासाठी पत्ता**

**रजिस्ट्रार ,**

**जिऑग्राफिकल इंडिकेशन रजिस्ट्री ऑफिस , इंटलेक्च्युअल प्रोपर्टी इंडिया बिल्डिंग ,जीएसटी रोड चेन्नई, पिन कोड नंबर 6000 32 ,ऑफिस नंबर 44- 22 50 20 92**

अधिकृत वापर करता नोंदणी करण्यासाठी वेद प्रपत्रातील अर्ज व त्यासोबत निर्धारित केलेली योग्य ती सर्व कागदपत्र जोडून सदरचा प्रस्ताव वर नमूद केलेल्या पत्त्यावर कुरियर किंवा स्पीड पोस्ट द्वारे पाठवावे लागते.

**अधिकृत वापर करता प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती**

- अधिकृत वापर करता प्रमाणपत्र मिळणे करता अर्ज प्राप्त झाल्यानंतर भौगोलिक चिन्हांकन नोंदणी कार्यालयामार्फत अर्जाची यांनी केली जाते ..
- छाननीत काही त्रुटी आढळून आल्यास त्या त्रुटीची पूर्तता करण्याकरिता संबंधित अर्जदार किंवा ज्या संस्थेमार्फत अर्ज प्राप्त झाला आहे त्यांना लेखी कळविण्यात येते .
- छाननीमध्ये जर अर्ज पूर्ण आढळून आल्यास त्या अर्जाची नोंद करून या अर्जात एक युनिक नंबर दिला जातो व त्याची नोंद सदर संस्थेच्या वेबसाईटवर केली जाते.
- सर्वसाधारणपणे अधिकृत वापर करतात नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी सहा ते आठ महिन्याचा कालावधी लागतो .
- अधिकृत वापर करता नोंदणी प्रमाणपत्र दहा वर्षासाठी ज्या शेतकऱ्यांनी अर्ज केलेला आहे त्या शेतकऱ्याच्या नावाने दिला जातो व त्याची नोंद सदर संस्थेच्या वेबसाईटवर नोंद घेतली जाते.

**अधिकृत वापर करता नोंदणीचे फायदे**

- भौगोलिक चिन्हांकन मानांकित नोंदणीकृत पिकाचे अधिकृत वापर करता म्हणून ओळख होते
- अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी केल्यामुळे जी आय चे लेबल लावून विक्री करता येते तसेच आपल्या पिकाची वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्माची ओळख निर्माण करून त्याची ग्राहकाला विक्री करण्यास मदत होते
- जी आय चा अधिकृत लोगो वापरून विक्री केल्यामुळे प्रीमियम किंमत मिळण्यास मदत होते
- जीआय मानांकित पिकाची  निर्यात दारा मार्फत निर्यात करता येते किंवा स्वतः निर्यात करता येते.

भौगोलिक मानांकन पिकांची नोंदणी करण्याकरिता तसेच नोंदणीकृत भौगोलिक चिन्हांकन पिकाच्या पिकाकरिता अधिकृत वापर करता म्हणून शेतकऱ्यांची नोंदणी करण्याकरिता तसेच त्याची प्रचार व प्रसिद्धी  ब्रँडिंग  ,विक्री व निर्यातीकरिता महाराष्ट्र, राज्य कृषी पणन मंडळ यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत संबंधित शेतकरी किंवा संबंधित संस्था यांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.

कृषी निर्यात धोरणांतर्गत कृषिमाल निर्यातीला चालना देण्यासाठी भौगोलिक चिन्ह्नांकन पिकाची नोंदणी व अधिकृत वापर करता म्हणून शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याकरिता कृषी विभाग. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व संबंधित पिकाचे भौगोलिक चिन्हांकन प्राप्त संस्थेच्या समंवयाद्वारे अधिकृत वापर करता नोंदणीचे खास मोहीम राबवून कार्यवाही करण्यात येत आहे त्यास संबंधित पिकाच्या उत्पादक शेतकऱ्यांचे चांगले सहकार्य मिळत आहे

सन 2021 -22 मध्ये अधिकृत वापर करता ची नोंदणी करण्याकरता खास मोहीम राबवून जास्तीत जास्त शेतकऱ्यांची भौगोलिक मानांकन प्राप्त पिकाकरिता  अधिकृत वापर करता नोंदणी करून त्याचे  ब्रँडिंग द्वारे स्थानिक बाजारपेठे

बरोबरच जागतिक बाजारपेठेत निर्यात करण्याकरिता खास प्रयत्न करण्यात येत आहे. तेव्हा सर्व जी आय  मानांकित संस्थानी पुढाकार घेण्याची गरज आहे

सध्या हापूस आंबा  घोळवड चिकू, सोलापूर डाळिंब ,सासवड सासवड अंजीर, सांगली वेदना, रत्नागिरी काजू ,जळगाव केळी या पिकाचे उत्पादनाकरिता व विक्री करिता अधिकृत वापर करता म्हणून काही शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली आहे. तसेच चालू वर्षी कोकणचा हापूस व  घोलवडचा चिकू याची जीआय लेबल लावून युनायटेड किंगडम या देशात प्रथमच निर्यात करण्यात आली तसेच जळगावची केळीची ही जीआय लेबल लावून दुबईला निर्यात झाली.

. भौगोलिक चिन्हांकनच्या वापरामुळे निर्यातीमध्ये अधिक प्रीमियम किंमत मिळत आहे. त्याचा फायदा जीआय मानांकित अधिकृत वापर करता शेतकऱ्यांना होत आहे तरी सर्व जीआय मानांकित पिकाच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी आपल्या पिकाचे / बागेचे अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

भौगोलिक **चिन्हांकन** (जीआय) - जीआय नोंदणीमध्ये महाराष्ट्र आघाडीवर



## दुबईमध्ये जीआय-प्रमाणित जळगाव केळीची निर्यात




## कोकण हापूस जीआय-प्रमाणित आंबा युनायटेड किंगडमला निर्यात

